सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक. ३१/१२/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. आरईएच-१२२५/ प्र.क्र.१२२ /विशा-५, दि. ३०/१२/२०२५.

**विषय :-** नाताळ व नववर्षासाठी खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापना दरवर्षी दिनांक २४,२५ व ३१ डिसेंबर रोजीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ०५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. आरईएच-१२२५/ प्र.क्र.१२२/ विशा-५, दि. ३०/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२३०१७३९२४४८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे).
कार्यासन अधिकारी. का.क्र. २४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

Scanned with CamScanner

**नाताळ व नववर्षासाठी खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापना दरवर्षी दिनांक २४, २५ व ३१ डिसेंबर रोजीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ०५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देणेबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : आरईएच-१२२५/प्र.क्र.१२२/विशा-५**

मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० डिसेंबर, २०२५

**वाचा:** १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.
२) अध्यक्ष, इंडियन हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशन, मुंबई यांचे दिनांक १८.१२.२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना -**

नाताळ व नववर्षानिमित्त खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनाधारकांना त्यांच्या आस्थापना डिसेंबर महिन्यातील दिनांक २४, २५ व ३१ रोजीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ०५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी मिळणेबाबत दरवर्षी विविध संघटनांकडून राज्य शासनास विनंती करण्यात येते. काही वेळेस याबाबतचे अर्ज शासनास विलंबाने प्राप्त झाल्यास त्याबाबतचे आदेश विहीत कालावधीत निर्गमित करणे शक्य होत नाहीत. अशा प्रकारची भविष्यात पूनरावृत्ती होऊ नये यासाठी खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनांना दरवर्षी डिसेंबर महिन्यातील दिनांक २४, २५ व ३१ रोजीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ०५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**_

खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनांकडून दरवर्षी येणारी मागणी व शासनस्तरावरील मंजूरी यामध्ये होणारा कालापव्यय विचारात घेता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ नुसार, दरवर्षी नाताळ व नववर्षानिमित्त राज्यातील खाद्यगृह, हॉटेल, रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनाधारकांना त्यांच्या आस्थापना डिसेंबर महिन्यातील दिनांक २४, २५ व ३१ रोजीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे ०५.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. आस्थापनाधारकाने आस्थापनेच्या आतील व बाहेरील बाजूस मुबलक प्रमाणामध्ये खाजगी सुरक्षा रक्षक तैनात करुन, सदर जागी कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. आस्थापनेच्या आतील बाजूस अथवा बाहेर कोणताही अनुचित प्रकार/गुन्हा घडल्यास व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी आस्थापनाधारकावर राहील. त्याप्रमाणे आस्थापनाधारक / परवानाधारक हे कारवाईस पात्र राहतील.

३. वेळेच्या संदर्भामधील शिथिलता ही जागेच्या परवान्याकरीता देण्यात येत आहे. परंतु ध्वनीक्षेपण कायदा व नियमांचे पालन करणे आस्थापनाधारकास बंधनकारक राहील. तसेच, याबाबत मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाने यासंदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करावा.

४. वरीलप्रमाणे वाढीव वेळेची परवानगी, फक्त बंदिस्त जागेतील / इमारतीमधील आस्थापनांनाच देण्यात येत आहे. मात्र सदर परवानगी खुल्या जागेकरीता लागू राहणार नाही.

५. उपरोक्त दिवशी सार्वजनिक शांतता तसेच, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५१२३०१७३९२४४८२९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AMOL NILAKANTH SAKHARKAR
Date: 2025.12.30 17:41:11 +05'30'

**( अ. नि. साखरकर )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत -**

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
३) मा. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा. अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा. प्रधान सचिव (राज्य उत्पादन शुल्क), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) सर्व पोलीस आयुक्त.
११) अध्यक्ष, इंडियन हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशन, मुंबई.
१२) निवडस्ती (विशा-५)